# मेट्रो-३ मार्गिकेसाठी स्वयंचलित भाडेआकारणी यंत्रणेची उभारणी

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे (एमएमआरसी) कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गिकेच्या सर्व स्थानकांच्या स्वयंचलित भाडे आकारणी यंत्रणा उभारण्यासाठी कालिंदी- एसिस समूहाची नियुक्ती करण्यात आली आहे.

आंतरराष्ट्रीय निविदा प्रक्रियेद्वारे जायकाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार एसिस इलेक्ट्रॉनिक व्ही.ई.बिलिसिम सिस्टेमलरी ए.एस, तुर्की आणि कालिंदी रेल (टॅक्समॅको रेल व इंजिनियरिंग भारत लि विभाग) निर्माण समूह या कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. कंत्राटदार मेट्रो-३ च्या २७ स्थानकांच्या स्वयंचलित भाडेआकारणी यंत्रणेचे आरेखन, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कमिशनिंगचे काम करणार आहेत. या प्रसंगी एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे म्हणाल्या की, स्वयंचलित भाडेआकारणी यंत्रणा ही मेट्रो-३ मार्गिकेसाठी अत्यंत महत्वाची असून त्यामुळे प्रवाशांसाठी उत्तम सुविधा उपलब्ध होणार आहेत. तसेच त्यामुळे प्रवाशांच्या वेळेची बचतही होणार आहे.

मेट्रो-३ प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी अत्याधुनिक स्वयंचलित भाडे आकारणी यंत्रणा उभारण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. मुंबईकरांना आरामदायी प्रवासासाठी एकात्मिक तिकीट आकारणी यंत्रणा प्रस्तावित केलेली आहे. त्यासाठी एमएमआरडीए राबवित असलेल्या कॉमन मोबिलिटी कार्डला मेट्रो-३ ची स्वयंचलित भाडेआकारणी यंत्रणा पूरक ठरेल, असेही त्या यावेळी म्हणाल्या.